I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** सदर बाज़ार **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0061 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/01/2025 23:49 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 23/01/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 23/01/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 13:53 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:34 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 23/01/2025 **Time (वेळ):** 23:20 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 045 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 23/01/2025 23:49 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 02 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** कर आकारणी व  कर संकलन विभाग, सोलापूर महानगरपालिका, , सोलापूर ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्‌दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निखिल जगन्नाथ गायकवाड

(b) **Father's Name (चे नाव ):** जगन्नाथ गायकवाड

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1996

(d) **Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):**भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सेटलमेंट, फ्री कॉलनी क्रं 03 , सोलापूर,, सदर बाज़ार, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | सेटलमेंट, फ्री कॉलनी क्रं 03 , सोलापूर,, सदर बाज़ार, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9850022829

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | चंद्रकांत लक्ष्मण दोंतुल | | वडील चे नाव : लक्ष्मण दोंतुल | 1. 1011 /1012,भाग्यनगर प्रगतीचौक,जुना विडी घरकुल,Town/Village (शहर / गाव): सोलापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): एमआईडीसी,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनातील नोटा | 28,745.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 28,745.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि:- 23/01/2025

मी श्री निखिल जगन्नाथ गायकवाड, वय 29 वर्षे, व्यवसाय - निखिल सॅनक्स सेंटर, रा. सेटलमेंट,

फ्री कॉलनी क्रं. 03 सोलापूर, शिक्षण - 12 वी नापास, मो.क्रं. 9850022829, समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की,

मी दि. 23/01/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक, श्री उमाकांत महाडिक यांचे समक्ष उपस्थित राहून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावर पोनि महाडिक यांनी माझ्या तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले व सदर ठिकाणी माझी व दोन्ही पंचांची एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की,

मी दि. 25/07/2023 रोजी श्री अजित सुर्यकांत जाधव, रा. सेटलमेंट कॉलनी नं. 01, सोलापूर यांचेकडुन सोलापूर महानगरपालिका हद्यीतील सेटलमेंट फ्री कॉलनी, नं. 03 झोपडपट्टी येथील झोपडी जागा एकुण क्षेत्रफळ 3000 चौ. फुट त्यावर 10 बाय 10 चे एकुण 02 पत्र्याच्या खोल्या व उर्वरीत मोकळी जागा असे एकुण 3,60,000/- रुपयांना नोटरी पध्दतीने विकत घेतली असुन सदर जागेच्या कर आकारणीस माझ्या नावाची नोंद होणेकरीता मी दि. 04/07/2024 रोजी कर आकारणी व कर संकलन प्रमुख विशेष कार्यकारी अधिकारी, हद्यवाढ विभाग, सोलापूर महानगर पालिका सोलापूर येथे अर्ज सादर केला. सदर अर्जाचे अनुषंगाने करआकारणी व कर संकलन विभाग, महानगर पालिका सोलापूर येथील वरिष्ठ मुख्य लेखनिक श्री चंद्रकांत दोंतुल यांचेकडे पाठपुरावा केला असता दोंतुल यांनी माझ्या प्रकरणामध्ये यापुर्वीच्या कोणत्याही नोंदी नसल्याने कर आकारणीस नोंद होण्याकरीता सन 1992 ते 31 मार्च 2025 पावेतोचा शासकीय कर भरावा लागेल असे सांगीतले. त्यावर मी त्यांना सदर कराची रक्कम विचारली असता त्यांनी हिशोब करुन 1,77,741 /- रुपये कायदेशीर भरावे लागतील व तेवढा कर भरायचा नसेल तर 50,000/- रुपये द्यावे लागतील असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी करीत असुन वरिष्ठ मुख्य लेखनिक श्री चंद्रकांत दोंतुल यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर हस्तलिखित तक्रार नोंदविली.

त्यानंतर पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर दोंतुल यांचेवर पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने ठिकाण निश्चित करण्याकरीता पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन मी माझा मोबाईल क्रं. 9850022829 वरुन दोंतुल यांचा मो.क्रं. 7773999515 वर फोन केला असता, त्यांनी पंधरा मिनिटानंतर महानगर पालिका सोलापूर येथे बोलाविले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर वरिष्ठ मुख्य लेखनिक दोंतुल यांचेवर पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने मला तसेच पंच 01 यांना पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील मोटार सायकलवरुन कर विभाग, महानगर पालिका सोलापूर येथे जाणेकरीता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच 01 असे महानगर पालिका सोलापूर येथे जात असतेवेळी मला दोंतुल यांचा मिस कॉल पडला त्यामुळे मी गाडी बाजुला घेवुन पुन्हा दोंतुल यांना फोन केला असता त्यांनी ते ऑफिसला आले असल्याबाबत सांगीतले. त्यावर मी त्यांना रामलाल चौक येथे असुन येत असल्याबाबत सांगुन फोन कट केला.

त्यानंतर मी व पंच 01 असे महानगर पालिका सोलापूर येथे जावुन तेथील प्रशासकीय बिल्डींगमध्ये असलेल्या कर विभागात दोंतुल बसतात तेथे गेलो असता तेथे दोंतुल उपस्थित होते. सदर ठिकाणी मी दोंतुल साहेब यांना नमस्कार करुन हस्तांतरीत फि झाली भरुन, बाकी डॉक्युमेंटस्‌ तुम्हाला दिलो असे सांगुन पुढचे काय सांगा असे सांगीतलो असता. दोंतुल यांनी मी सांगीतलो त्याप्रमाणे द्या, 05 वाजेपर्यंत करुन देतो असे म्हणाले. त्यानंतर दोंतुल यांनी कॅलक्युलेटरवर हिशोब करुन सन 1992 ते 2016 पावेतो 24 वर्षाचे 6,156/- रु प्रमाणे 1,47,744/- रु. व सन 2016 ते 2025 पावेतो 9 वर्षाचे 2,333/- रु. प्रमाणे 20,997/- रु तसेच युजर चार्जेस 9,000/- रु असे एकुण 1,77,741 /- रुपये कायदेशीर भरावे लागतात तर मी सगळं बघतो, तुम्ही 60,000/- रुपये द्या असे म्हणाले. त्यावर मी त्यांना चालतय असे म्हणालो.

त्यानंतर दोंतुल यांनी मला चहा पिण्याकरीता जावु असे म्हणाले त्यामुळे दोंतुल त्यांचे मोटारसायकलवर व मी तसेच पंच 01 माझ्या मोटार सायकलवरुन महानगर पालिका सोलापूर येथुन निघालो. काहीअंतर पुढे जावुन दोंतुल रस्त्याचे कडेला थांबले. त्यांच्या शेजारी मी देखील मोटार सायकल उभी केली. सदर ठिकाणी दोंतुल यांनी 60 नको 50 मध्येच करुन देतो, तुमचे बिल कितीही निघु द्या मी 50 मध्येच करुन मार्च 25 पर्यंत टॅक्स भरुन तुमच्या हातात पावती देतो असे म्हणुन 50,000/- रुपयांची मागणी केली. व सदरची रक्कम सोलापूर महानगरपालिका येथील कर आकारणी व कर संकलन विभाग येथे घेवुन येण्यास सांगीतले त्यामुळे मी पंच 01 यांच्यासह पुन्हा अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

सदर प्रकरणामध्ये दोंतुल यांनी 50,000/- रुपयांची मागणी केली परंतु त्यापैकी किती रक्कमेची पावती देणार हे पावती दिल्यानंतरच स्पष्ट होणार असल्याने दोंतुल हे आज रोजी काम पुर्ण करणार आहेत का याची खात्री करण्याकरीता पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन मी माझ्या मोबाईलवरुन दोंतुल यांना फोन करुन विचारणा केली असता दोंतुल यांनी 02 तासात काम पुर्ण करुन देतो असे सांगीतले.

त्यानंतर वरिष्ठ मुख्य लेखनिक श्री चंद्रकांत दोंतुल यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 50,000/- रुपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर वरिष्ठ मुख्य लेखनिक श्री चंद्रकांत दोंतुल यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन सोलापूर महानगर पालिका येथे जाणेकरीता रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी व पंच 01 असे सदर ठिकाणी कर आकारणी व कर संकलन विभाग येथे दोंतुल बसतात त्याठिकाणी गेलो असता तेथे दोंतुल उपस्थित होते.

तेथे दोंतुल यांनी मला त्यांचे पाठीमागे येण्यास इशारा करुन इथे नको तिकडे जाऊ पुढे.. असे म्हणुन त्या इमारतीचा जिना चढुन पहील्या मजल्यावर घेवुन जावुन तेथे आणले पैसे असे विचारले

त्यावर मी आणले की, असे सांगीतले. त्यावर दोंतुल यांनी हात पुढे करुन द्या मगं सगळे असे म्हणाले. त्यावर मी त्यांना माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम काढुन त्यांना दिली व मोजुन घ्या असे सांगीतले. त्यावर दोंतुल यांनी मोजायची काय आवश्यक्ता नाही. विश्वास असायला पाहीजे असे म्हणुन सदरची रक्कम घेवुन त्यांचे नेसते पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवली. आणि मला 01 तास बसा असे म्हणाले.

त्यानंतर दोंतुल यांनी माझ्या करआकरणीच्या कामाच्या अनुषंगाने सर्व कामकाज पुर्ण केले. व मला चला असे म्हणाले. त्यावर मी व पंच 01 असे दोंतुल यांचे पाठीमागे निघालो. त्यावर दोंतुल यांनी आम्हाला महानगर पालिकेच्या शेजारी असलेल्या हुतात्मा स्मृती मंदीर, नाटय गृहच्या आवारात असलेल्या कर आकारणीचे कॅश काउंटर येथे घेवुन गेले. सदर ठिकाणी दोंतुल यांनी कॅश काउंटरवरील इसमास माझा मिळकत क्रं. 280754 असा सांगीतले. त्यावर नमुद इसमाने निखिल जगन्नाथ गायकवाड असे सांगीतले. त्यावर माझ्या नावाची खात्री झाल्याने दोंतुल यांनी पावती करा व एनओसी पण द्या असे सांगीतले. त्यावर कॅश काउंटरवर असलेल्या इसमाने दोंतुल यांनी भरलेल्या माहीतीवरुन ऑनलाईन जनरेट झालेली पावती काढुन दोंतुल यांना दिली. सदरची पावती दोंतुल यांनी मला दिली ती पाहीली असता ती 21,255/- रुपयांची होती त्यावरुन दोंतुल यांनी माझ्याकडुन 50,000/- रुपये घेवुन फक्त 21,255/- रुपयांची पावती दिल्याने दोंतुल यांनी माझ्याकडुन उर्वरीत रक्कम 28,745/- रुपये लाच रक्कम स्वरुपात स्विकार केला असल्याबाबत माझी खात्री झाली. त्यानंतर मी पोनि महाडिक यांना नियोजीत इशारा केला. व दोंतुल यांना हे सोडुन दुसर काही भरायच नाहीना असे विचारुन खात्री केली असता दोंतुल यांनी काही भरायचे नाही असे सांगीतले. व त्यावेळी पोनि महाडिक, पंच व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. त्यावेळी मी त्यांना सांगीतले की, दोंतुल यांनी माझ्याकडुन 50,000/- रुपये घेवुन 21,255/- रुपयांची पावती दिली आहे. त्यावरुन दोंतुल यांनी माझ्याकडुन उर्वरीत रक्कम 28,745/- रु स्वत:करीता लाचेची रक्कम स्विकारली आहे. त्यावरुन पोनि महाडिक यांनी दोंतुल यांना पकडले.

सदर ठिकाणी नाटयगृह असल्याने व लहान मुलांची गर्दी असल्याने पोनि महाडिक यांनी दोंतुल यांना पकडुन हुतात्मा स्मृती मंदीर नाटय गृहाच्या कोप-यात घेवुन जावुन सदर ठिकाणी त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री चंद्रकांत लक्ष्मण दोंतुल, वय 55 वर्षे, पद - वरिष्ठ मुख्य लेखनिक, कर आकारणी व कर संकलन विभाग, महानगर पालिका सोलापूर, रा. घर नं. 1011 /1012, भाग्यनगर प्रगतीचौक जुना विडी घरकुल, सोलापूर, असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 23/01/2025 रोजीचे 13.53वा. ते 17.34 वा. च्या दरम्यान आरोपी लोकसेवक श्री चंद्रकांत लक्ष्मण दोंतुल, पद - वरिष्ठ मुख्य लेखनिक, कर आकारणी व कर संकलन विभाग, महानगर पालिका सोलापूर यांनी आपले स्वत:चे पदाचा दुरूपयोग करून माझ्या जागेची कर आकारणीस नावाची नोंद करणेकरीता तसेच कराची रक्कम कमी करुन भरण्याकरीता 50,000/- रुपये स्विकारुन त्यापैकी 21,255/- रुपये कर रक्कमेची पावती मला देवुन उर्वरीत 28,745/- रु लाच स्वरुपात स्वत:करीता स्विकारले आहेत म्हणुन माझी आरोपी लोकसेवक श्री चंद्रकांत लक्ष्मण दोंतुल, पद -

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

वरिष्ठ मुख्य लेखनिक, कर आकारणी व कर संकलन विभाग, महानगर पालिका सोलापूर यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

पोनि/महाडिक
अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** Umakant Netaji Mahadik **Rank (हुद्दा):** पोलीस उपनिरीक्षक

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** ajit shankar lakade

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1970 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**